RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On : 12 August 2015 :: Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 14 August, 2015

अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : तेरा | अंक : दुसरा | ऑगस्ट २०१५

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती) 4

विरहाची पीडा (सत्संग) 5

सतगुरूंच्या चरणाची धूळ (प्रश्नोत्तरे) 23

अनमोल वचन (संदेश) 32

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

धन्य अजायब

परमसंत अजायब सिंह महाराजांच्या मधुर आठवणीतील
सन्तबानी आश्रम, १६ पी एस राजस्थान येथील कार्यक्रमांची माहीती

गुरुप्रिय बंधू–भगिनींनो,

परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या कृपेने दरवर्षीप्रमाणे **सन्तबानी आश्रम, १६ पी एस राजस्थान येथे सत्संगाचे कार्यक्रम** निम्नलिखित दिवशी होतील. सर्व प्रेमी बंधु–भगिनींनी कार्यक्रमात सहभागी होऊन आश्रमातील शांत वातावरणात नामस्मरणाचा आणि संत–वचनांचा लाभ घ्यावा.

७ सप्टेंबर ते ११ सप्टेंबर २०१५
२३ ऑक्टोबर ते २५ ऑक्टोबर २०१५
२७ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबर २०१५
२५ डिसेंबर ते २७ डिसेंबर २०१५

विरहाची पीडा

सत्संग: परमसंत अजायब सिंहजी महाराज, मीराबाईंची वाणी,
संत बाणी आश्रम, १६ पी एस, राजस्थान – २९ सप्टेंबर १९९४

मी माझे गुरूदेव परमात्मा सावन कृपालजींच्या चरणी नमस्कार करतो, ज्यांनी आपल्या गरीब आत्म्यांवर कृपा केली. आपला आत्मा सत्पुरुषाचा अंश आहे, परमात्म्याचे मुल आहे. हा आपले खरे घर, आपले अस्तित्व विसरलेला आहे. हा आपल्या सुख–शांतीचे वास्तव्य असलेल्या घरास विसरून या जगामध्ये आला, जेथे वारंवार घर बदलावे लागते. येथे येऊन आपण कितीवेळा जनावरांच्या योनीत तसेच इतर योनींमध्ये जन्म घेतला ते माहित नाही. जनावराच्या जन्मातही कोणत्या ना कोणत्या स्वरूपात आपण घर बनवितो. मनुष्य जन्मामध्ये त्याहून जरा अधिक चांगले घर बनवतो. मनुष्य जन्मामध्ये आई–वडिल, बहिण–भाऊ अशा बंधनांमध्ये अडकतो आणि आपल्या खऱ्या पित्यास, परमात्म्यास विसरून जातो.

संत–महात्मे या जगामध्ये एखादा नवीन धर्म बनविण्यासाठी येत नाहीत व अगोदर अस्तित्वामध्ये असलेला एखादा धर्म नाहीसा करण्यासाठीदेखील येत नाहीत. ते केवळ जेथून आपला आत्मा या जगात आला आहे, तेथील परतीच्या मार्गावर आपल्या आत्म्यास नेऊन ठेवतात. परमात्म्याच्या प्राप्तीसाठी आपणांस ना आपल्या कानात छेद करण्याची गरज आहे ना घर–दार वा मुले–बाळे त्यागण्याची गरज आहे, तसेच ना हिंदूंना मुसलमान बनण्याची ना ख्रिश्चनांना शिख बनण्याची गरज आहे. केवळ परमात्म्याचे वास्तव्य असलेल्या घराकडे आपणांस जाण्याची गरज आहे जेथून आपला आत्मा आलेला आहे.

आपण म्हणतो की आपला आत्मा परमात्म्याचा अंश आहे व संतांच्या वाणीचा हवाला देतो की कबीर साहेब, गुरू नानक देवजींनीदेखील हेच सांगितले आहे. मग प्रश्न उद्भवतो की जर आपला आत्मा परमात्म्याचा अंश

आहे तर मग आपण आपल्या स्वगृही म्हणजेच परमात्म्याकडे परतणे कोणती अवघड गोष्ट आहे? नाही! हे आपल्या आवाक्यात नसते. आपले घर किती दूर आहे, तेथे जाणारा मार्ग किती लांब-रुंद तसेच खोल आहे, याची आपणांस कल्पना नाही. परमात्म्याने आत्म्यास दुरावून परतीच्या मार्गावर खूप भयानक पहारे लावले आहेत. वाटेत कुठे आशा-तृष्णाचे तर कुठे काम-वासनेचे नाना प्रकारचे पहारे उभे केलेले आहेत. ज्याप्रमाणे वाळवंटात चालताना पुढे पाऊल टाकताच ते मागे येते, तशी आपली अवस्था आहे.

प्रियजनहो! जे महान संत परमात्म्याच्या आज्ञेवरून या जगात येतात, ते संतच आपणांस या मार्गावर आणू शकतात. ते आपणांस प्रेमाने सांगतात की, आपण आपला समाज बदलण्याने त्या मार्गावर जाऊ शकत नाही. तो मार्ग कोणी तयार केलेला नाही. आपण त्या मार्गास अखुड किंवा लांब करू शकत नाही, तसेच त्यामध्ये आपण काही बदल करू शकत नाही. त्या मार्गाची निर्मिती स्वत: परमात्म्याने केलेली आहे. गुरूसाहेब सांगतात :

घर में घर दिखाए दे सो सतगुरु पुरख सुजान।

महात्मा आपणांस प्रेमाने सांगतात की, जे लोक केवळ पुस्तके वाचून महात्म्यांच्या वाणींवर विश्वास ठेवतात की, आपण ही वाणी वाचली आहे, ती वाणी वाचली आहे; ते लोक स्वत:ची तसेच इतरांचीदेखील फसवणूक करतात. संतमत आपणांस सांगते की, जो परमात्म्याशी स्वत: जोडलेला असतो, तोच आपणांस परमात्म्याशी जोडू शकतो, ज्याप्रमाणे जो व्यक्ती स्वत: सुशिक्षित असतो तोच इतरांना शिकवू शकतो.

प्रियजनहो! हा अनुभव आयुष्यामध्ये स्वत:च घ्यावा लागतो. आपल्या हट्टी मनाबरोबर कोणत्याही हत्याराशिवाय लढावे लागते. त्या महात्म्यांनी स्वत: हे आयुष्यामध्ये अनुभवलेले असते, ते आपणांस सांगतात की मार्गामध्ये कोणकोणत्या अडचणी येतील? त्यांना कसे दूर करावयाचे असते?

महात्मा आपणांस प्रेमाने सांगतात की, सत्संगीने नाम घेतल्यानंतर सतत नामस्मरण करावयास हवे, तसेच चालता, फिरता कोणाशी बोलताना वा निद्रावस्थेतही तुमचे लक्ष दोन्ही नेत्रांच्या मध्यभागी एकाग्र असावयास हवे. दोन्ही नेत्रांच्या मध्यभागी तुमचे लक्ष जेव्हा सदैव एकाग्र होईल, तेव्हा तुम्हांस तेथे प्रकाश दिसू लागेल. जेव्हा तुम्ही अधिक एकाग्र व्हाल तेव्हा सहस्रदल कमळाचा हजारो दिवे लुक-लुक करीत असल्याप्रमाणे मनास लुभावणारा प्रकाश तुम्हांस दिसेल. चकमकणारी वीज आपल्या मनास मोहविते. ती कधी ढगांमध्ये तर कधी ढगांबाहेर येऊन लखलखते. अशी दृश्ये जेव्हा आपण तेथे पाहतो, तेव्हा आपण आणखीन जास्त एकाग्र होऊ लागतो, तेव्हा आपणांस आपल्या आत्म्याचे सर्वे-सर्वा असलेल्या सतगुरूंची प्रतिमा ब्रह्म त्रिकुटीमध्ये स्थिर झालेली दिसेल. ते स्वरूप आपल्या अंतर्यात जर अगोदरपासूनच प्रगट असेल, तर आपण हवा तो प्रश्न त्यांना विचारू शकतो. अंतर्यात गेल्यानंतर कोणतीही शंका बाकी उरत नाही. ज्या महात्म्यांनी त्यांच्या जीवनात हे सर्व पाहिलेले असते, तेच महात्मा आपणांस या मार्गावर नेऊ शकतात. ते आपणांस प्रेमाने समजावतात की ही चर्चा करून वा शिकून-वाचून प्राप्त करण्याची बाब नाही.

महाराज सावन सिंहजी रावणाचे उदाहरण देत असत की रावण खूप शिकला-सवरलेला होता. रावणी टीका अजूनही प्रसिद्ध आहे. परंतु त्याच्या मनाने त्याची फसवणूक केली. त्याने स्वत:चा सर्वनाश करवून घेतला. महात्मा आपणांस प्रेमाने सांगतात की, जर शिक्षणाने वा विश्वास ठेवल्याने जर आपला प्रश्न सुटत असता, तर ऋषी-मुनींनी काय चुकी केली होती? त्यांनी तर खूप हठयोग केले होते. परंतु मनास जेव्हा संधी मिळाली तेव्हा त्याने त्यांचे रूपांतर हाडांच्या ढिगामध्ये करून टाकले, त्यांची खिल्ली उडविली. कबीर साहेब सांगतात :

कबीरा ऐह मन मश्करा, कहूँ तो माने रोश।

संत महात्मा परमात्म्यापासून दुरावलेल्या आत्म्यांचा परमात्म्याशी पुन्हा मिलाप करून देण्याचे कार्य करतात. परमात्म्याचे प्रियजन जेव्हा या जगामध्ये येतात तेव्हा त्यांचा उद्देश केवळ परमार्थाचा प्रचार करणे हाच असतो. ते एखादा नवीन समाज बनविण्याचा वा अस्तित्वात असलेला समाज नष्ट करण्याचा प्रचार करीत नाहीत. जोपर्यंत ते या जगामध्ये असतात, तोपर्यंत त्यांचा प्रचार त्यांच्या लेखण्यांना अनुसरून चालू रहातो. जेव्हा ते परमात्म्याचे प्रियजन याजगात दोन–चार वा दहा पिढ्या राहून ते येथून प्रस्थान करतात, त्यानंतर आपली मन–बुद्धीच्या जाळ्यात फसगत होते. त्यांनी ज्या वाण्या सर्व समाजांसाठी लिहिलेल्या असतात, त्यास आपण एका धर्म वा जातीचे रूप देतो व आप–आपसांमध्ये भांडण–तंटे व युद्ध करू लागतो.

महात्मा त्यांचे सर्व जीवन आपला गैरसमज दूर करण्यामध्ये व्यतीत करतात की परमात्म्याने जन्म देताना कोणत्याही मनुष्यास हिंदु, मुसलमान, शिख वा ख्रिस्ती म्हणून जन्मास घातले नाही. मरणोपरांतदेखील आपणांस कोणी हे विचारणार नाही की तू हिंदु, मुसलमान, शिख वा ख्रिस्ती यांपैकी कोण आहेस? कुराण शरीफमध्ये मोहम्मद साहेबांनी नमूद केले आहे की *'रबूल आलमीन'*. त्यांनी असे म्हटले नाही की *'रबूल मुसलमीन'*. ते सांगत आहेत की, परमात्मा केवळ मुसलमानांचा नसून तो सर्व विश्वाचा आहे, सर्वच विश्वाला आधार देत आहे. संत–महात्मा आपणा सर्वांना एकत्रित करून जातात, परंतु आपण त्यामध्ये लहान–लहान समूह बनवितो, त्यांना वेगवेगळ्या समाजांचे रूप देतो. असे आपण आपल्या उदरभरणासाठी किंवा मान–मोठेपणा प्राप्त करण्यासाठी करतो. स्वामीजी महाराज सांगतात :

पंडित भेख पेट के मारे, वे सन्तन पर करते तान।
हितकर सन्त उन्हें समझावें, वे माने नहीं माने आन।
उनको चाह मान और धन की परमार्थ से खाली जान।।



अशारितीने आपण मान-मोठेपणा मिळविण्यासाठी खऱ्या मार्गापासून दूर भरकटत जातो. लहान-लहान समूह तसेच कर्मकांड रचून त्यामध्ये अडकून जातो. नंतर संत-महात्मे इतर एखाद्या ठिकाणी जन्म घेतात.

महाराज कृपाल सांगत असत, ''संत कोणत्या परिवारिक वा सामाजिक वा गृहस्थी बंधनात अडकलेले नसतात. ते तर केवळ सर्व विश्वाला नामाशी जोडण्याकरीता येतात.'' आपण प्रेमाने सांगता की जेव्हा असे आत्मा इतर कोणत्या ठिकाणी जन्मास येतात, तेव्हा त्यांच्या अंतरामध्ये त्यांच्या प्रिय

आत्म्यांप्रती खूप जिव्हाळा असतो. ते पुन्हा नव्याने त्यांचा परमात्म्याच्या शोधाची सुरुवात करतात, त्यांच्या अंतरामध्ये परमात्म्याच्या प्राप्तीसाठी खूप तळमळ असते. मी नेहमी सांगत असतो की, येथे स्त्री किंवा पुरुषाचा प्रश्न नसतो की, केवळ स्त्रियाच परमात्म्याची भक्ती करू शकतात किंवा पुरुषच परमात्म्याची भक्ती करू शकतात.

प्रियजनहो! परमात्मा तर कृपेचा सागर आहे. त्याचे द्वार प्रत्येकासाठी उघडे आहे. त्याचे द्वार जर केवळ एका धर्मासाठी वा जातीसाठी उघडे असते तर आपण त्यास अनंत वा कृपा करणारा परमात्मा असे म्हटले नसते. त्याचे द्वार सर्वांसाठी उघडे असते, त्यामुळे त्याची भक्ती कोणीही करू शकतो.

मी नेहमी सांगत असतो की, लिंगभेद केवळ आपल्या दशमद्वारापर्यंतच आहे. आपल्या आत्म्यावर सर्वप्रथम स्थूल आडपडदा आहे, त्याच्या आत सूक्ष्म व त्याच्याही आतमध्ये कारण आडपडदा आहे. आत्मा जेव्हा हे तीन्ही आडपडदे दूर सारून पारब्रह्मामध्ये पोहोचतो, तेथे त्याचे तेज बारा सूर्यांच्या तेजासमान होते. तेथे पोहोचल्यावर आत्म्यास ज्ञान होते की, मी विनाकारणच जात–धर्मांमध्ये अडकून पडलो होतो. माझे खरे घर तर दुसरेच आहे. तेथे गेल्यावर आत्म्यास समजते की, माझादेखील कोणी परमात्मा आहे, माझेही घर आहे. जे स्वरूप परमात्म्याचे आहे, तेच स्वरूप आत्म्याचे आहे. दोघांमध्ये फरक एवढाच आहे की, परमात्मा समुद्र असून आत्मा त्याचा एक थेंब आहे. समुद्रामधून पाण्याची वाफ होते व त्याचे ढगांमध्ये रूपांतर होते. ढगांमधून पुन्हा ते पावसाच्या रूपाने जमिनीवर येते. जमिनीवर कोठे घाण तर कोठे केर–कचरा, वाळलेले गवत पडलेले आहे. पाणी त्यावर पडून स्वत:स त्या घाणीचा भाग समजू लागते, त्यापासून दुर्गंध येऊ लागतो. जेव्हा त्याच पाण्यास सूर्याची उष्णता मिळते, ते पाणी वाफ बनून उडून जाते व त्याचे ढगांमध्ये रूपांतर होते. त्यावेळी पाण्याच्या लक्षात येते की, माझे खरे रूप तर ढग आहे. मी विनाकारणच स्वत:स घाण समजत होतो.

याचप्रमाणे आपला आत्मा परमात्मारूपी समुद्राचा थेंब आहे. याने मनाच्या राज्यामध्ये येऊन मनाची संगत जोडली. मन आत्म्यासोबत समाधान न मानता, ते इंद्रियांशी संगत जोडते. इंद्रियांनी इच्छा व आशांची सोबत घेतली. मनामध्ये जी इच्छा निर्माण होते, तिची आपुर्ती करण्यासाठी आपण इंद्रियांची मदत घेतो. हे सर्व मन आपल्याद्वारे करवून घेते. संत–महात्मा जेव्हा मनास शब्द–नामाशी जोडतात, तेव्हा त्यास शब्द–नामाचा शेक (उर्जा) मिळतो. त्यामुळे जेव्हा आत्मा–परमात्म्यास जाऊन मिळतो, तेव्हा त्याच्या लक्षात येते की, माझे खरे अस्तित्व परमात्मा आहे. मी परमात्म्यापासून दुरावलो होतो व आता पुन्हा परमात्म्यामध्ये जाऊन विलिन झालो आहे. हे असे आहे की, पाण्याची वाफ होऊन जेव्हा ते ढगामध्ये सामावते, तेव्हा पाण्याच्या ध्यानात येते की, मी ढगांपासून दुरावलो होतो, आता पुन्हा ढगांमध्ये सामावलो आहे.

मी सांगितले होते की, भक्ती स्त्री वा पुरुष, बालक वा वृद्ध कोणीही करावी, परमात्मा त्याचा स्वीकार करतो. येथे श्रीमंत वा गरीबाचा प्रश्न नसतो. जो परमात्म्याचे स्मरण करतो, परमात्म्याची भक्ती करतो, परमात्मा त्याचा आहे. गुरूसाहेब सांगतात :

हर को भजे सो हर का होय।

सर्व समाजांमध्ये मीराबाईंनी रचलेली काव्ये गायली जातात. आपण मीराबाईंच्या भक्तीचे नेहमी उदाहरण देत असतो. अशा भक्तांच्या जीवनाची म्हणजे ते कधी जन्मास आले, त्यांनी कधी शरीर त्यागले, याची खरी माहिती आपणांस नसते. ग्रंथांमध्ये केवळ अंदाज वर्तवलेला असतो.

साधारणपणे त्या–त्या काळातले पंडित, कवी आणि भाट लोक, त्यांच्या काळातील राजांचे खूप गुणगान करीत असत, त्यांचा इतिहास लिहित असत, कारण राजदरबारामध्ये त्यांचा आदर–सत्कार होत असे. त्यांना तेथून खाण्या–पिण्यास मिळत असे. त्यांना भक्तांकडून काय मिळू शकते?

भलेही मीराबाईंचा राजघराण्याशी संबंध होता. परंतु त्यांना राजघराण्यावरील कलंक मानला जाई. आपण जेव्हा अशा पंडितांनी लिहलेले ग्रंथ वाचून पाहतो, तेव्हा त्यामध्ये मीराबाईंच्या जीवनाची खास माहिती मिळत नाही.

आज साडे–चारशे वर्षांनंतरही लोकांच्या जिव्हेवर मीराबाईंच्या भजनांचा ठसा उमटलेला आहे. त्यास कोणीही नष्ट करू शकला नाही. मीराबाईंची भजने लोकं अतिशय प्रेमाने गातात. ज्याप्रमाणे मीराबाईंच्या अंत:करणात परमात्म्याच्या **विरहाची पीडा** होती, तशीच **विरहाची पीडा** सर्व संतांच्या अंत:करणात व्यापलेली आहे. त्यांच्या अंतरात जर ही पीडा नसती, तर त्यांनी परमात्म्यास कसे प्राप्त करून घेतले असते? भक्तांच्या अंतरात जेव्हा **विरहाची पीडा**, विरहाचा अग्नी प्रज्वलीत होतो, तेव्हा परमात्मा तो अग्नी शांत करण्यासाठी शब्द–नामरूपी अमृत पाठवितो, जे प्राशन केल्याने भक्तास तृप्ती मिळते. तुम्ही कोणत्याही संतांच्या हृदयाची अवस्था पाहा! गुरू रामदासजी महाराज सांगतात :

अंतर प्यास उठी प्रभ केरी, सुन गुरु वचन मन तीर लगई या।

आपण सांगता की, माझ्या हृदयात परमात्मा मिलनाची वेदना निर्माण झाली. त्यास आम्ही जंगल, पर्वत, मंदिरे, गुरूद्वारे, तीर्थक्षेत्री शोधले. परंतु जेव्हा गुरू अमरदेवजींकडे गेलो, तेव्हा ते म्हणाले,''अरे भल्या माणसा! परमात्मा तर तुझ्या अंतर्यात वसतो, तू कोठे बाहेर फिरत आहेस?'' त्यांनी सांगितल्याप्रमाणे मी अंतर्यात एकाग्र केले, तेव्हा तेथे परमात्म्याचे दर्शन झाले. त्यांचे वचन एखाद्या बाणासमान हृदयात लागले. गुरूसाहेब सांगतात :

रामभक्त अणियाले तीर।

ज्याची विवेकबुद्धी असते, त्यास समजते की, तो बाण कशा प्रकारचा आहे. तो बाण अणकुचीदार आकड्याच्या आकाराचा असल्याने, तो बाहेर निघत नाही, आत रूतून बसतो.

हौं आकल विकल भई गुरु देखे, हौं लोट पोट हो पई ऐ।

सुरुवातीला सतगुरूंकडे पाहून आत्मा म्हणतो की, हे माझ्याप्रमाणेच मनुष्य आहेत. माझ्याप्रमाणेच चालतात–फिरतात आणि खातात–पितात. परंतु मनुष्या–मनुष्यामध्ये खूप फरक असतो. मी सुरुवातीलाच सांगितले होते की, सत्संगी जेव्हा स्वत:चे लक्ष दोन्ही भृकुटींच्या मधोमध एकाग्र करीत नामस्मरण करतो, उठता–बसता, चालता–फिरता त्याचे लक्ष दोन्ही नेत्रांच्या मध्यभागी एकाग्र होते, तेव्हा त्यास प्रकाश दृष्टीस पडतो. तो आणखीन एकाग्र झाल्यावर त्यास सहस्र दल कमळाचा प्रकाश विजेप्रमाणे लखलखताना दिसतो. तो आणखीन एकाग्र होऊन पुढे जातो, तेव्हा त्यास सतगुरूंचे मन–मोहक स्वरूप तेथे स्थिर झालेले दिसून येते.

सत्संगीने जर सतगुरूंना अंतर्यात प्रगट करून घेतले असेल, तर त्याने विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर सतगुरू देतात. सतगुरू स्वरूप प्रगट झाल्यावर सत्संगी त्यास सोडू शकत नाही. त्यांच्या दर्शनाशिवाय सत्संगीस अन्न–पाणी वगैरे कशातच रूची वाटत नाही. ज्याप्रमाणे मुले लपाछपीचा खेळ खेळतात, तसेच अंतरामध्ये होऊ लागते. सतगुरू कधी सत्संगीस दर्शन देतात तर कधी लपतात. असे ते विरहाची कळ निर्माण करण्यासाठी करतात जेणेकरून सत्संगीमध्ये जर काही कमतरता उरली असेल तर ती दूर व्हावी.

दर्शन न झाल्यास प्रेमी रात्री ठीकठाक झोपू शकत नाही, रात्रभर तो तळमळत राहतो, उभे राहून रात्र व्यतीत करतो. तुम्ही महात्म्यांची जीवनचरित्र वाचून पहा! ज्यांना हे सहन करावे लागते, त्यांनाच याची जाणीव असते. हजरत बाहु सांगतात :

पोह माघ मंगे खरबूजे, मैं कित्थो ल्यावां वाड़ी हू।
न सोवे न सोवण देवे, हो रहा बाल रिहाड़ी हू।।

ज्याप्रमाणे बाळ एखाद्या वेदनेने रात्रीचे रडत असते. आई त्याचे सर्व उपाय करूनही ते रडण्याचे थांबवत नाही, त्याप्रमाणेच ते ना स्वत: झोपतात, ना इतरांना झोपू देतात, कारण त्यांच्या अंतरात **विरहाची पीडा** असते.

महाराज सावन सिंहजी रात्र-रात्र जागत असत, उभे राहत असत. महाराज कृपालजींच्या वेदनेने भरलेल्या गोष्टी आपण ऐकत असतो की, ते रावी नदीमध्ये बर्फाप्रमाणे थंड असलेल्या पाण्यामध्ये उभे राहत जेणेकरून त्यांची **विरहाची पीडा** दूर व्हावी, प्रिय सतगुरूंची भेट व्हावी. ते सांगत असत, ''गूंगा पैलवान प्रसिद्ध का झाला? तो रात्रभर जागून कसरत करीत असे.'' ज्यांच्या हृदयामध्ये **विरहाची पिडा** असते, ते असे करतात.

आपला जर सहचारी सोडून गेला, तर त्याच्या मामुली विरहाच्या पीडेने आपण किती रडतो, तळमळतो? अन्नही ग्रहण करीत नाही. अशा वेळी आपण परमेश्वरामध्येही दोष काढतो. परंतु आपणांस परमात्म्याच्या विरहाची कधी आठवण आली का? सतगुरू आपल्या अंतरामध्ये असूनही आपण त्यांस भेटत नाही, काय आपण कधी स्वत:चा धिक्कार केला? कधी हृदय तळमळले की मी तुझ्या आठवणींमध्ये उभा असून तू मला दर्शन दे! आपले हृदय या जगातील एखाद्या नातेवाईकासाठी जेवढे तळमळते, तेवढेही आपले हृदय सतगुरूंसाठी तळमळत नाही. सतगुरूंना जेव्हा आपण भेटतो, तेव्हा म्हणतो की तुमचे अंतर्यात दर्शन होत नाही. पत्रामध्ये आपण लिहितो की मी ध्यान-अभ्यास तर करीत नाही. आता तुम्हीच सांगा निद्रावस्थेमधील व्यक्तीच्या अंतर्यातील पडदा कसा बरे दूर सारला जाईल?

मीराबाईंच्या गोष्टी आपणा सर्वांना माहिती आहेत. सर्व संतांची जीवनकथा एकसमानच असते की, परमात्म्याच्या प्राप्तीसाठी त्यांना आयुष्यामध्ये किती-किती कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागते? त्यांनी वाईट कर्मं केलेली नसतात की त्यांची परतफेड म्हणून त्यांच्यावर कठीण प्रसंग यावेत. परमात्म्यास त्यांना या जगातून बाहेर काढावयाचे असते. हे जग मिथ्या आहे, जे कायमस्वरूपी नसून नाशिवंत असते, त्यास मिथ्या म्हटले गेले आहे. गुरू नानक देवजी महाराज सांगतात :

कूड़ राजा कूड़ प्रजा कूड़ सब संसार।
कूड़े कूड़ा न्यौं लग्गा विसर गया करतार।।

हे जग मिथ्या आहे. राजा–प्रजा कोणीही येथे सदोदित राहणार नाही. पती–पत्नीचे प्रेमदेखील मिथ्या आहे. एके दिवशी एक तर पती नाहीतर पत्नी हे जग सोडून जाईल. नाशिवंत वस्तुंचे नाशिवंत वस्तुंवर प्रेम जडले आहे आणि आपण परमात्म्यास विसरून गेलो आहोत.

तुम पलक उघाड़ो दीनानाथ हौं हाजिर नाजिर कब की खड़ी।।

आपण जेव्हा सतगुरूंनी दिलेले नामस्मरण करीत स्थूल, सूक्ष्म आणि कारण पडदे दूर सारून आपल्या नेत्रांच्या मागे येतो. तेथे पोहोचल्यावर परमात्म्यास आवाज देतो. बुल्लेशाह सांगतात :

घुंड चक सज्जणा हुण शरमा कासनूं रखियां।

प्रिया! तू आता आडपडदा का ठेवला आहेस? तुला माझी लज्जा वाटते काय? तू सर्वांमध्ये तुप मुरल्याप्रमाणे सामावलेला आहेस. आता मी तुझ्याजवळ आलेलो आहे. तुला कसली लज्जा वाटते? तू आता आडपडदा दूर कर.

त्याचप्रमाणे मीराबाई सांगतात,''मी दररोज नामस्मरण करीत नेत्रांच्या मागे एकाग्र होते. आता तरी तू मला दर्शन दे. मी रात्रं–दिवस निद्रावस्थेतही व जागृत अवस्थेतही समोर उभी आहे.'' ज्यांचे आंतरिक भांडे तयार होते, त्यांना पाय आखडून बसायची गरज पडत नाही. कबीर साहेब सांगतात :

भजन तेल की धार साधना अधके साधी।

आपला आत्मा जेव्हा सर्व पडदे दूर सारून पारब्रह्मामध्ये पोहोचतो, तेव्हा आपली अशा तन्हेची अखंडवृत्ती होते की ज्याप्रमाणे तेलाची संतत धार खंडीत होत नाही. मीराबाई म्हणतात, ''मी कधीपासून उभी आहे, तुम्ही नेत्र उघडून तर पहा.''

साहू ते दुश्मन होई लागे, सबमें लगूं कड़ी।

जे सज्जन आपले मित्र, हितसंबंधी असतात, ते आपल्याशी कोणत्या ना कोणत्या पद्धतीने शत्रुत्व करू लागतात. काठीने हाणामारी करून ते शत्रुत्व करीत नाहीत, परंतु वेळ आल्यास तसेही करण्यास ते मागे-पुढे पाहत नाहीत. आपले मित्र-मंडळी म्हणतात, ''तू कोणत्या मार्गास लागला आहेस? आता तर आपले खाण्या-पिण्याचे दिवस आहेत.''

आई म्हणते,''मुला! तुला काय त्रास आहे? तू या वयातच का भक्ती मार्गास लागला आहेस?'' वडील म्हणतात, ''भक्ती करणे तर आम्हां वृद्धांचे काम आहे, तू का त्या दिशेने जात आहेस?''

असे आपल्या सर्वांसोबत घडत असते. एखाद्यास परमात्म्याच्या भक्ती मार्गावरून दूर करण्यापेक्षा आणखीन कोणते मोठे शत्रुत्व असू शकते? मुलाने मद्यपान केल्यास, जुगार खेळल्यास आई-वडील खुश होतात. त्यांना वाटते आपला मुलगा खूप काही मोठे काम करु लागला आहे. मुलास भक्ती करताना पाहून खुश होणारी एखादीच भाग्यशाली आई असते.

कबीर साहेबांचे पालनपोषण करणाऱ्या आईस कोणीतरी म्हटले की, तुझ्या घरी दररोज खूप संगत येते, त्यामुळे तुझ्या घरी आनंदी-आनंदच असेल. सर्व लोक तुला नमस्कार करतात. कबीर साहेबांची आई म्हणते :

सुणों दराणी सुणों जठानी अचरज ऐह भयो।
सात सूत ऐह मुंडए खोयो ऐह मुंडयो क्यों न मुयो।
जबकी माला लई नपूते तब ते सुख न भयो।।

कबीर साहेबांची आई म्हणते,''भगिनींनो! आम्हांला काय सहन करावे लागते, हे आमचे आम्हालाच माहिती आहे. हा आमच्या घरातील धाग्याची देखील काळजी घेत नाही. मृत्यु लोकांना येतो, पण हा काही मरत नाही. जेव्हापासून हा राम! राम! करू लागला आहे, तेव्हापासून आमच्या घरातील सुखांना पंख फुटून ते उडून गेले आहे.''

तुम्ही विचार करा! तिला किती त्रास सहन करावा लागत होता? आज आपण कबीर साहेबांचे प्रेम–आदराने स्मरण करतो. त्यांच्या आईस शुभेच्छा देतो तिची स्तुती करतो की, तिने महान बालकास जन्म दिला. परंतु त्यावेळी काय अवस्था होती. आईस वेदना होत होत्या.

मीराबाई देखील हेच सांगतात,''आम्ही जेव्हा परमात्म्याची भक्ती करतो, तेव्हा सज्जन लोकदेखील आमचा द्वेष करतात. मी ज्यांच्याजवळ बसते ते देखील माझा द्वेष करतात.'' गुरू नानकदेवजी सांगतात:

आवत को जाता कहे जावत को आता।
जागत को सूता कहे सूते को जागत।
राते की निन्दा करे ऐसा कल में डिट्ठा।।

जी व्यक्ती परमात्म्याप्रती जागृत होते, तिच्याबद्दल सांसारिक लोक म्हणतात की हा आता आपल्यातला राहिला नाही, हा तर निद्रावस्थेत गेलेला आहे, हा एकांतप्रिय आहे, यास काय माहित आहे? जो जगाकडे आकर्षित झालेला आहे त्यास आपण तो जागृत आहे असे म्हणतो. परंतु जो परमात्म्याप्रती जागृत आहे, त्यास आपण निद्रावस्थेमध्ये आहे असे मानतो. जे परमात्म्यामध्ये एकरूप होतात त्यांची कलियुगात निंदा केली जाते.

मीराबाई सांगत आहेत,''हे परमात्मा! यावेळी अशी अवस्था आहे की, सज्जन लोकही माझा विरोध करीत आहेत. मी तुझ्या द्वारी उभी आहे. आता मला केवळ तुझाच आश्रय आहे. तू माझ्यासाठी आडपडदा दूर कर.''

तुम बिन साऊ कोऊ नहीं है डिगी नाव मेरी समुंद्र अड़ी।

मीराबाई सांगत आहेत,''माझी नाव समुद्रामधील भोवऱ्यात अडकली आहे. तूच माझ्या नावेचा नाविक आहेस. तुझ्याशिवाय माझी नाव पार करण्यासाठी दुसरा कोण आहे? तूच माझी नाव पार करू शकतोस.''

दिन नेह चैन रात नेह निन्द्रा सूखूं खड़ी खड़ी।

मीराबाई सांगत आहेत,''मला दिवसा चैन पडत नाही व रात्री झोपही येत नाही. निद्रे तुला विकत घेऊ इच्छिणारा जर गिऱ्हाईक असेल तर मी तुला क्विंटलच्या भावाने विकून टाकीन. ज्या घरी परमेश्वराचा भक्त नाही, अशा घरी तू जा. तू भक्तांच्या द्वारी का येतेस?''

विरहाच्या पीडेने ग्रस्त असणाऱ्यास चैन कशी पडणार? अशी अवस्था जेव्हा प्रेमीची होते, तेव्हा तो खाटेवर स्वस्थ झोपूही शकत नाही व शांतपणे बसूही शकत नाही. खूप अस्वस्थ होऊन तो फिरत राहतो. गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात :

घट दुख निंदड़ीए पिर प्रेम लगा।
वध सुख रे नड़िए पिर स्यों सदा पगा।।

ते रात्रीस सांगतात,''तुझ्यामध्ये वृद्धी होवो, कारण आम्ही परमात्म्यामध्ये लीन झालेलो आहोत. दिवस उगवल्यावर आम्हाला परमात्म्याच्या **विरहाची पीडा** सहन करावी लागेल. जग भेटावयास आल्यावर त्यांना भेटावे लागेल. निद्रेस सांगतात की, तू दुःखास आमंत्रित करतेस, त्यामुळे तू कमी हो.''

मी ७७ आर. बी. येथे असताना तेथे पाश्चिमात्य देशातून एक पती-पत्नीचे जोडपे आले. पतीने विचार केला! आपण खूप पैसे खर्च करून येथे आलो आहोत, तर ध्यान-अभ्यास करावा. त्याने प्रेमाने त्याच्या पत्नीसही जागे केले. परंतु त्याची पत्नी रागावली की तू मला का उठवलेस? मी तिला म्हणालो की, त्याने तुला केवळ ध्यान-अभ्यास करण्यासाठीच उठवले आहे, इतर कोणत्या दुष्कृत्यासाठी तर नाही उठवले ना! तुम्ही विचार करा! आपल्या अंतरामध्ये प्रभू प्रेमाचा अग्नी भडकलेला असेल, तर आपणांस झोपेतून जागृत करणाऱ्या व्यक्तीस आपण दुवा देणार नाही का? त्याचा धन्यवाद करणार नाही का? कबीर साहेब सांगतात :

सुत्ता साध जगाई ऐ करे नाम का जाप।
तीनों तो सुत्ते भले साकत सिंग और साँप।।

सापास जागृत केले तर तो डंख मारेल, वाघास जागृत केले तर तो उठवणाऱ्याची हत्या करेल, दुर्जनास जागृत केले तर तो राग-राग करेल, परंतु झोपलेल्या साधुस जर उठवले तर तो नामाचा जप करेल व जागृत करणाऱ्याचे आभार मानेल. ध्यान-अभ्यास करणारा त्याला जागृत केल्यास रागावेल काय? परंतु आपण जेव्हा ध्यान-अभ्यास करीत नाही, तेव्हा जागृत करणाऱ्याकडे रागाने पाहतो.

सुरुवातीस माझ्याकडे दोन शब्दांचे नाम होते. त्यावेळी आम्ही गावो-गावी तसेच माझ्या आश्रमातही ध्यान-अभ्यासाचा कार्यक्रम आयोजित करत असू. अनेकजण थंडीचे ऊबदार कपडे अंगावर घेऊन बसत. जर ऊबदार कपडे अंगावर घेऊन बसल्यास आपोआपच झोप येते. मी एका प्रेमीस नेहमी सावध करी, कारण तो ध्यान-अभ्यास करताना खूप जोराने घोरत असे, तसेच त्याच्या घोरण्याचा इतरांनाही त्रास होत असे. त्याला सावध केले असता, तो म्हणत असे, नाही! मी झोपलोच नाही. मी झोपलो तर मला पकडून दाखवा. मला आवाज द्या. एकदा मी त्याच्या घरातील दोन प्रेमींना बोलावले व त्यास निद्रेतून उठविले. त्यास उठविले असता तो अतिशय रागाने आमच्याकडे पाहू लागला. मी त्यास म्हणालो, आम्ही तुझे काही नुकसान तर केले नाही ना? त्या प्रेमीचे गाव पंजाबपासून तीस मैल दूर अंतरावर होते. तो सांगू लागला,''मी मागच्या गावामधून बैलगाडी घेऊन जात होतो. वाटेमध्ये माझी बैलगाडी झाडांमध्ये अडकली. तेव्हा मी माझ्या भावास हाक मारत होतो की, ये! आपण बैलगाडी बाहेर काढू.''

तुम्ही विचार करा! आपण सत्संगास येतो, तेथे झोपी जातो, ध्यान-अभ्यासासाठी बसलो असतानाही झोपी जातो आणि जर का कोणी आपला हा झोपण्याचा दोष दर्शवला तर आपण स्वत:ची बाजू मांडतो. परंतु जे भक्त आहेत, ते निद्रेस सांगतात, तू आमच्याजवळ येऊच नकोस.

बाण बिरह के लगे हिय में भूलूं न एक घड़ी।

मीराबाई सांगतात,''माझ्या हृदयामध्ये विरहाचा बाण असा काही घुसला आहे की मी त्यास विसरू शकत नाही.'' प्रियजनहो! आपण म्हणतो की ध्यान-अभ्यासामध्ये बसणे जड जाते, त्यावेळी झोप येते. आपली अशी अवस्था का आहे? कारण आपल्या हृदयामध्ये अजूनपर्यंत विवेक निर्माण झालेला नाही. जोपर्यंत विवेक निर्माण होत नाही, तोपर्यंत विरहाचा बाण आपणांस लागत नाही. मंदिर, मस्जिद किंवा गुरूद्वारामध्ये जाऊन एखादी फेरी मारून यावे, तसे आपण सत्संगास जातो. आपण जाऊन, सत्संग ऐकतो, परंतु सत्संगामध्ये जे काही ऐकतो त्यानुसार अंमलबजावणी करीत नाही. अंमलबजावणी करून तर पहा! मग विरहाचा बाण का बरे लागणार नाही?

पत्थर की तो अहिल्या तारी बन के बीच पड़ी।
कहा बोज मीरा में कहिए सौ ऊपर एक घड़ी।।

आपण पुराणांमध्ये कथा वाचतो की गौतमऋषींची धर्मपत्नी अहिल्या गौतमऋषींच्या शापामुळे शिला बनली होती. रामचंद्रजी महाराजांच्या स्पर्शामुळे तिचा उद्धार झाला होता.

मीराबाई सांगतात की,''दगड नाम जपू शकत नाही, संगतमध्ये जाऊ शकत नाही; त्यास तर स्वत:च्या अस्तित्वाची कल्पनाही नसते. मग माझा उद्धार करणे तुला अवघड आहे का? मी तर तुझ्या नामामध्ये रत झाली आहे. तुझ्या नामाच्या आसऱ्याने, नामाच्या प्रतापाने सर्वांचा उद्धार झाला आहे.'' चतुरदास सांगतात :

कब्र तों वी लंघ जाए सोहणा, होया वास जे पास कदी।

ज्यांचे आंतरिक नेत्र उघडलेले असतात, ज्यांच्या अंतरामध्ये महान सतगुरूंप्रती प्रेम व दृढ विश्वास असतो, ते म्हणतात की अशा महापुरुषांचे थडगे जरी कोणी ओलांडून गेले, तरी त्या मनुष्याचा उद्धार होतो.

गुरु रैदास मिले मोहे पूरे धुर से कलम भिड़ी।

साधारणत: सामाजिक सामान्य माणसे म्हणतात की आपणांस सतगुरूंची वा संतांची गरज नाही. ज्यांच्या हृदयामध्ये परमात्म्याच्या मिलनाची ओढ निर्माण झाली नाही वा ज्यांच्यावर परमात्म्याने अद्याप कृपावर्षाव केला नाही, अशीच लोकं असे म्हणू शकतात. गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात :

गुरु मंत्रहीनस जो प्राणी दीर्घन्त जन्म भ्रष्टने।
कूकर सूकर काक गदर्भ खल तुल्हे।

ज्या मनुष्यास एखाद्या महात्म्यांद्वारे शब्द–नामाची प्राप्ती झालेली नाही तो मनुष्य कुत्रा, डुक्कर, साप आणि गर्दभासमान आहे. ज्याप्रमाणे कुत्रा आपला जन्म व्यर्थ गमावतो, डुक्कर घाणीमध्ये लोळत, साप जमिनीवर मातीमध्ये सरपटत तर गाढवे उकिरड्यामधील घाणीत लोळत जीवन व्यर्थ गमावतात, तसेच जे मनुष्य विषय–विकारांच्या घाणीमध्ये बरबटले जातात, ते देखील आपले आयुष्य व्यर्थ गमावितात.

मीराबाई सांगतात,''मला परिपूर्ण गुरू रविदासजी लाभले. जेथूने माझ्या आत्म्याचा विरह झाला होता ते कलम(कनेक्शन) जोडले गेले आहे. सतगुरू आपल्या आत्म्याचे कलम आहेत. आपला आत्मा परमात्म्यामध्ये जाऊन एकरूप होतो. ही माझ्या गुरू रविदासजींची कृपा आहे की त्यांनी माझी हाक ऐकली, जेथून माझा आत्मा दुरावला होता, तेथे त्यास पुन्हा जोडले. माझा आत्मा वेडा होऊन कधी उच्च तर कधी नीच योनींमध्ये भरकटत होता.''

सतगुरु सेन दई जब आके जोत में जोत रली।

मीराबाई सांगत आहेत,''सतगुरूंनी निर्देश करून मला सांगितले की हा मार्ग तुझ्या घरी जातो, जेथून तुझा आत्मा दुरावून आला आहे. त्यामुळे माझा ज्योतरूपी आत्मा, परमज्योतीमध्ये एकरूप होऊन गेला आहे.'' आपण त्यास सेन, ज्योत, नाम, शब्द, कलमा काहीही म्हणू शकतो.

गुरू नानकदेवजी महाराज त्यास रब्बी बाणी, धुर की बाणी, सच्ची बाणी, अमर हुकूम, कीर्तन, अकथ कथा अशा अनेक नावांनी त्यांचे संबोधन करतात. कबीर साहेबांनी त्यास शब्द–नाम, अकथ कथा म्हटले आहे. स्वामीजी महाराजांनी त्यास शब्द–नाम, मूल कलाम म्हटले आहे. मुसलमान फकीरांनी त्यास बांगे असमानी, कलमा, निदाय सुल्तानी असे संबोधले आहे. ऋषी–मुनींनी त्यास अंतरातील राग, दिव्य–धुनी, आकाशवाणी संबोधून त्याची आठवण करून दिली आहे. येथे मीराबाई त्यास सेन म्हणत आहेत. गुरू अर्जुनदेवजी देखील म्हणतात :

ज्यों जल में जल आए खटाना त्यों ज्योति संग मिल ज्योत समाना।।

ज्याप्रमाणे मलिन जल गंगेत मिळाल्यावर गंगाजल बनून जाते व एखादी पूर्णपणे गंजलेली सुरी सानेवर घासल्यास ती स्वच्छ व चमकदार होते, त्याचप्रमाणे आपला आत्मा जरी सांसारिक, विषय–विकारांमध्ये बरबटलेला व पापांच्या ओझ्याखाली दबलेला असला तरी आपण जर दररोज नामस्मरण केले तर नामस्मरण सानेप्रमाणे आत्म्यास स्वच्छ करण्याचे काम करते. आपला आत्मा आरशाप्रमाणे स्वच्छ व चमकदार बनतो. आपली आत्मारूपी लहान ज्योत, परमज्योतीमध्ये सामावून एकरूप होते.

मीराबाई सांगतात की,''माझे सतगुरू रविदासजी मला भेटले, त्यांनी माझ्यावर कृपा करून, मला आंतरिक परमार्थाचे रहस्य समजावून सांगितले.'' आपणांसदेखील मीराबाईंच्या या लहानशा वाणीतून प्रेरणा घ्यावयास हवी, अंत:करणापासून आपला ध्यान–अभ्यास करावयास हवा आणि आपले जीवन पवित्र करावयास हवे.

***

सतगुरूंच्या चरणाची धूळ

परम संत अजायब सिंहजी महाराजांद्वारे प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे,
सांपळा, हरियाणा – ११ फेब्रुवारी १९९७

प्रेमी : *सतगुरूंच्या चरणांची धूळ म्हणजे काय?*

बाबाजी : बंधुंनो! खूप चांगला प्रश्न आहे. त्याचे उत्तर सर्वांनी काळजीपूर्वक ऐकावे. ज्या–ज्या महात्म्यांनी संतांच्या चरणांची आंतरिक तसेच बाह्य स्वरूपातील धूळ मिळवली, त्यांनी त्या धूळीचा महिमा वर्णिलेला आहे. प्रियजनहो! आपणांस जर बाह्य चरणांची धूळ प्राप्त झाली नाही, आपण त्या धूळीची कदर केली नाही, तर आपल्याला अंतर्यात जाण्याची ओढच निर्माण होत नाही, आपण परमात्म्यास प्राप्त करूच शकत नाही. गुरूमताचे अ–ब–क–ड (बाराखडी) देहापासूनच सुरू होते.

आपणांस कल्पना आहे की, आपले प्रेम आपल्या समान असलेल्याशीच जुळते. ज्यास आपण कधी पाहिलेले नसते, आपण त्याची कल्पना कशी करू शकतो? त्याचे ध्यान कसे बरे धरू शकतो? परमात्मा सर्व विश्वव्यापक, अलख, अगम, अगोचर आहे. परमात्मा आपली कमतरता जाणतो की हे मला स्वत:हून भेटू शकत नाहीत, मला पाहू शकत नाहीत, कारण आपले हे बाह्य नेत्र परमात्म्यास पाहू शकत नाहीत. आपले हे पाय परमार्थाची चढाई चढू शकत नाहीत. आपण लुळे, पांगळे आहोत, हे नेत्र असूनही आपण अंध आहोत. आपण त्या अलख परमात्म्यास पाहू शकत नाही.

आपली ही कमतरता पाहूनच कृपेचा सागर असलेल्या परमात्म्यास आपली दया आली. तो स्वत:च मनुष्यदेह धारण करून या संसारात आला व त्याने स्वत: येऊन आपल्या मिलनाचा मार्ग आपणांस सांगितला. गुरू अर्जुन देवजींच्या वाणीत सतगुरूंप्रती अलोट प्रेम दिसून येते. आपण सांगता :

मैं देख देख न रज्जां गुरु सतगुरु देहा।

खरे तर संत आपणांस त्यांच्या बाह्य चरणांची धूळ उचलू देत नाहीत. कारण प्रत्येकजण त्यासाठी त्यांच्या मागे लागतो. परंतु प्रेमी या धूळीची खूप कदर करतात, कारण त्यांना हिचे महत्त्व माहित असते.

प्रियजनहो! हा प्रश्न अगोदरही अनेकदा विचारला गेला आहे. या संदर्भात मी लहानशी कविता म्हणतो की जर परमपिता परमात्मा कृपाल देह धारण करून आज जरी या जगात आले, तरी मी त्यांची चरण-धूळ उचलीन.

आपणांस कल्पना आहे की जो कोणी एकदा हे जग सोडून जातो, मग ते वली, पैगंबर वा परमात्मारूप झालेला महात्मा असो, तो पुन्हा या संसारात त्याच स्वरूपामध्ये येऊ शकत नाही, असा परमात्मा लिखित, विधीचा नियम आहे. मला महाराज कृपालजींसोबत चालण्याची अनेकदा संधी लाभली. माझ्या शेतामध्ये फिरताना ते खूप आनंदी होत असत. त्यांच्या सोबत चालताना मला खूप चांगले वाटत असे, कारण त्यांच्यासोबत चालणे म्हणजे परमात्मा सोबत चालण्यासारखेच प्रतीत होत असे.

जेव्हा कधी खुष होऊन ते मला त्यांच्या कारमधून फिरण्यासाठी नेत असत. तेव्हा मला असे प्रतीत होई की, मी त्यांच्या जहाजामध्ये बसून उड्डाण करीत आहे. खरेतर प्रवासामध्ये ते स्वत:चे खूप अनुभव सांगत असत. परंतु मी माझ्या ज्या नादामध्ये मशगुल असे त्याची केवळ मलाच कल्पना होती की त्यामध्ये मला किती आनंद प्राप्त होई.

ते सांसारिक गोष्टी सांगत नसून पारमार्थिक गोष्टी सांगत असत. ते काही भुतकाळातील तर काही भविष्यकाळातील हृदयस्पर्शी गोष्टी सांगत असत. एकदा मी परमात्मा कृपालजींच्या चरणांची धूळ उचलून घेतली असता ते म्हणाले,''तू हे काय करीत आहेस?'' त्यावेळी मी त्यांना प्रेमपूर्वक ही कविता ऐकवली :

तेरी सजरी पैर दा रेता चुक चुक लां लां हिक नूं।
प्यारेया तेरे पंज शब्दां ने मैंनू तारया।

प्रियजनहो! मी ती चरणधूळ अतिशय सन्मानपूर्वक आणि प्रेमपूर्वक सांभाळून घेतली आहे. परमात्मा सावन-कृपालजींचा ज्या चादरीस स्पर्श झाला होता ती पावन चादर अनमोल मानून मी सांभाळून ठेवली आहे. मी या वस्तूंना पाहतो, तेव्हा त्यांच्या आठवणी पुन्हा ताज्या होतात. मी जेव्हा बाहेरगावी जातो, तेव्हा त्यांनी दिलेले कोट मी अत्यंत प्रेमाने आणि सन्मानाने वापरतो. एक कोट मी रसल प्रकिन्सला देऊन मी त्यास सतगुरूप्रेम वाटले.

प्रियजनहो! हा आहे त्यांच्या बाह्य चरणधूळीचा महिमा. ज्यांच्या हृदयामध्ये या बाह्य धूळीबद्दल सन्मान असतो, तिच्याबद्दल प्रेम असते, ते प्रेमी अशा चरणधूळीस स्वत:च्या जीवनाचा अतुट भाग समजतात. त्यांच्याच हृदयामध्ये तळमळ जागृत होते की मी त्या पावन चरणांपर्यंत पोहोचावे आणि त्यांची धूळ प्राप्त करावी. ज्या माझ्या आंतरिक नेत्रांना मोतीबिंदू झाला आहे, त्या माझ्या नेत्रांमध्ये ही धुळ घालून त्यांचा सुधार करावा, त्यांना डोळस बनवावे. गुरू अर्जुनदेवजींनी त्यांच्या सतगुरूंकडून या जगातील ना धन-संपत्ती, ना मुले-मुली, ना जमीन-जुमला, ना सत्तेची मागणी केली. त्यांनी हेच मागितले :

नानक दास यही सुख दीजे मोको कर सन्तन की धूड़ी।

सत्संगामध्ये नेहमी सांगितले जाते की, आपण जेव्हा इतरत्र विखुरलेले लक्ष नामस्मरणाच्या मदतीने आपल्या नेत्रांच्या पाठी एकाग्र करतो व स्थूल, सूक्ष्म आणि कारण हे तीन्ही पडदे दूर सारून अंतर्यात शब्दाशी एकरूप होतो, तेथे संतांचे पवित्र चरण आहेत. आपण जेव्हा सूर्य, चंद्र, तारे पार करून त्या पवित्र चरणांजवळ पोहोचतो, तेव्हाच आपण खरे शिष्य बनतो. अंतर्यात जाऊन ध्वनी नाद कसा ऐकावा याचा बाहेर केवळ सरावच करून घेतला जातो. सतगुरू अंतर्यात या विश्वाच्या कणा-कणामध्ये व्यापलेल्या ध्वनीशी आपणांस जोडतात. तो ध्वनी आपण एकदा का एखाद्या क्षणापुरता जरी ऐकला, तरी आपण या जगातील विषय-विकारांमध्ये फसण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही, आपल्या जीवनाची दिशाच बदलून जाते. काळाच्या फासाच्या

बंधनातून मुक्त झाल्यावरच आपण तो ध्वनी ऐकतो. गुरू गोविंद सिंहजींनी ध्वनीचा महिमा वर्णन केला आहे :

एक चित्त जो ईक छिन ध्यावे, काल फाँस के बीच न आवे।

जर एखाद्या नशिबवान आत्म्याने शरीराची नऊ द्वारे त्यागून, क्षणभर जरी आंतरिक ध्वनी ऐकला, तरीही तो आत्मा या जगातील सर्व बंधनांतून मुक्त होतो. मुसलमानांच्या पवित्र ग्रंथात लिहिले आहे, जर कोणी खुदाच्या पुत्राचा आवाज ऐकला तर कबरींमधून मुडदेदेखील उठून उभे राहतील. प्रियजनहो! हा ध्वनी तोच आहे फरक आहे तो केवळ शब्दांचा. या ध्वनीबद्दल निरनिराळ्या महात्म्यांनी निरनिराळ्या भाषेत लिहिले आहे.

गुरू नानकदेवजींनी एका वाणीमध्ये लिहिले आहे,''कलियुगाचे हे लक्षण आहे की मृतास जिवित म्हटले जाते, जाणाऱ्यास आलेला तर येणाऱ्यास जाणारा म्हटले जाते. परमात्म्याच्या मार्गावर चालणाऱ्यास 'हा आमच्यातून गेला' असे म्हटले जाते. जो सांसारिक गोष्टींमध्ये साथ देतो त्यास म्हणतात 'हा आमच्यासाठी आला' 'हा जिवंत आहे'. गुरू नानकदेवजी सांगतात :

राते की निन्दा करे ऐसा कल में डिट्ठा।

जसा पाण्याचा थेंब समुद्रात जाऊन मिळतो, तसेच जे लोक परमात्म्यास भेटून त्याच्यामध्ये विलीन होतात, अशा लोकांची सामान्यजन निंदा करतील. कलियुगाचा असा प्रभाव असेल की लोकं अशा महात्म्यांचा विरोध करतील. तुलसी साहेबदेखील सांगतात :

छिन छिन सुरत संभार लार बिरके रहो।

क्षणो–क्षणी आपले लक्ष सांसारिक गोष्टींकडे खेचले जाते, कारण आपल्या शरीराची नऊ द्वारे या संसाराच्या दिशेनेच उघडतात. त्यास नामस्मरणाच्या मदतीने आपण तीसऱ्या तिळावर एकाग्र करावे. नामस्मरण आपल्या शरीरास तसेच मनातील विचाररूपी कोळिष्टकांस स्वच्छ करणारा झाडू आहे. नामस्मरण आपल्या आत्म्यास स्वच्छ करते. आपले भरकटणारे मन जेव्हा

तीसऱ्या तिळावर एकाग्र होते, तेव्हा आपल्या अंतर्यामधील अंध:कार नष्ट होतो, ती जागा प्रकाशमय होते. तुलसी साहेब सांगतात :

लगन लखे सत पार तो पाया हां रे सन्त चरण की धूल नूर दरसाय।

तुम्ही त्यास तेज म्हणा वा प्रकाश म्हणा, संत त्यास धूळ असे संबोधन करतात. संतांच्या चरणाच्या धूळीच्या महिमेचे वर्णन प्रत्येक संतांनी केले आहे. जो गुरू चरणांपर्यंत पोहोचतो, त्यासच खरा सेवक म्हटले जाते. पुढे सतगुरूंची जबाबदारी असते, ते यास एका आंतरीक मंडळामधून दुसऱ्या आंतरीक मंडळामध्ये घेऊन जातात.

जेव्हा प्रेमींना नामदान प्राप्त होते, त्यांना मी सांगतो की, ''मला आनंद होत आहे की, तुम्हांस समुद्रामध्ये बुडी मारण्याची संधी लाभली आहे. तुम्ही आता प्रेमाच्या समुद्रात बुडी मारून नामरूपी मोती मिळवा.''

भाई सतिदास, मतिदास सतगुरूंच्या धूळीमध्ये एकरूप झाले होते. त्यांना दिल्लीमध्ये खूप आमिषे दाखवली गेली. परंतु त्यांनी सतगुरूंचा मार्ग त्यागला नाही. त्यासाठी त्यांनी स्वत:चे शरीर आरीने कापून घेण्याचा मार्ग पत्करला. भाई मतिदास, सतिदास त्यांच्या सतगुरूं सदर्भात त्या लोकांना म्हणाले की, तुम्ही सतगुरूंना बाह्यस्वरूपात पाहत आहात, तर आम्ही अंतरातून त्यांचे आंतरिक स्वरूप पाहत आहोत.

प्रियजनहो! आपण घाई करतो, गुरूमताचा आपणांस विसर पडतो, कारण आपण नामाची कमाई करीत नाही, अंतर्यात जाऊन सत्य पाहत नाही. सतगुरूंच्या कृपेनेच जीव पार होतो. सतगुरू स्वत: कमावलेल्या नामाचा कण बक्षिसरूपाने देऊन लाखो-करोडो आत्म्यांना पार करतात. खरेतर ते याच कामासाठी जगामध्ये आलेले असतात. सतगुरूंची इच्छा असते की, सेवकाने सांसारिक गोष्टींमध्ये न भरकटता, नामाची कमाई करून माझ्या जीवनकाळामध्ये परिपूर्ण व्हावे. त्याने पहावे! मी यास काय देण्यासाठी जन्म घेतला आहे.

प्रियजनहो! आई मुलाच्या अंतरामध्ये प्रेमाचा ठेवा ठेवते. नाहीतर मुलास काय कल्पना की ही माझी आई आहे, हीने माझे पालन–पोषण केले आहे. सर्वप्रथम आईच बाळाच्या अंतरामध्ये आपल्या नेत्रांद्वारे प्रेमाचा ठेवा ठेवते, त्या मुक्या बाळास बोलण्यास शिकवते. ज्यावेळी मुल तोडके–मोडके शब्द बोलतो, त्यावेळी आईस होणाऱ्या आनंदाचा कोणी अंदाजही करू शकत नाही. आई स्वत: आनंदी होते व इतरांनाही सांगते की माझ्या बाळाने हे शब्द उच्चारले आहेत. गुरू नानकदेवजी त्यांच्या वाणीमध्ये लिहिले आहे :

सुत अपराध करत है जेते, जननी चीत ने राखस तेते।

अनेकदा बाळ आईस विटेनेदेखील मारते, त्यास कल्पना नसते की, त्यामुळे जखम होऊ शकते. अनेकदा बाळ स्वत:सही जखमी करून घेते. आईच्या अंतरामध्ये परमात्म्याने प्रचंड सहनशीलता ठेवलेली असते. ती त्याबद्दल वाईट वाटून घेत नाही. प्रियजनहो! याचप्रमाणे शिष्याच्या अंतरामध्ये गुरूच प्रेम निर्माण करतात. तेच आपले सुप्तावस्थेतील प्रेम जागृत करतात. सतगुरूंना ओळखू शकण्या इतकी सेवकामध्ये कुवत कुठे असते? महाराजजी उदाहरण देत असत,''अंध मनुष्यात डोळस मनुष्यास ओळखण्या इतकी कुवत नसते. जोपर्यंत डोळस मनुष्य स्वत: आपले बोट आंधळ्याच्या हातात देत नाही, तोपर्यंत तो ओळखू शकत नाही.''

तुम्ही शांत चित्ताने विचार करा! तुमच्याबद्दल महाराज कृपालजींना कोणी सांगितले? त्यांनी समुद्राच्या तळाशी तसेच पर्वतांच्या शिखरावर जाऊन देखील परमार्थ मार्गावरून भटकलेल्या आत्म्यांना महाराजजींनी स्वत: शोधले. जगात असे एकही ठिकाण नाही, जेथे ते गेले नाहीत. त्यांनी सर्व आत्म्यांना एकत्र केले. पलटू साहेब सांगतात :

उन्हें क्या है चाह सहत दुख घनेरा, जीव तारन कारणे फिरदे मुल्क बथेरा।

प्रिय मुलांनों! वृद्ध शरीर असूनही कोणत्याही मोबदल्याशिवाय नि:स्वार्थपणे प्रवास करणे, आपल्या मावशीच्या घरी जाण्याइतपत सोपे नसते. या जगामध्ये

असा विरळाच कोणी असतो, जो नि:स्वार्थपणे सेवा करतो. सतगुरू सर्वांना आपले मानत असतात, पण त्यांना मात्र कोणी आपले मानत नाही. भाग्यशाली आत्मेच सतगुरूंना आपले मानतात.

प्रियजनहो! सतगुरूंना सेवकाकडून केवळ हीच अपेक्षा असते की, परमार्थ मार्गावरून भटकलेल्या आत्म्याने ध्यान-अभ्यास करून त्यांच्याकडे जावे. ज्याप्रमाणे मुल बोलावयास शिकले असता आईस आनंद होतो, त्याच प्रमाणे सेवक जेव्हा ध्यान-अभ्यास करण्यास बसतो तेव्हा सतगुरूंना होणाऱ्या आनंदाची कल्पना केवळ तेच जाणतात.

ज्यांच्या अंतर्यात हे तेजस्वी चरण, तेजोमय चरण-धूळ व तेजस्वी प्रकाश प्रगट होतो, त्याचे मन गुरूंप्रती इतके दृढ बनते की, संपूर्ण जग त्याच्या विरुद्ध गेले तरीही तो विचलीत होत नाही. अशा आत्म्यांच्या अंतरात कमालीची सहनशीलता व धीर निर्माण होतो. त्यास जाणीव असते की, त्यास प्राप्त होणारे सुख-दु:ख सतगुरूंद्वारेच मिळत असते.

प्रियजनहो! महाराज कृपाल सांगत असत, ''सतगुरू मनुष्यास सुख देतात तसेच दु:ख देखील देतात. प्रेमी आत्म्यास सर्व दृष्टीस पडते की आपले सतगुरूच आलेले आहेत. भले ते त्या प्रेमीचे प्राण घेण्यासही येवोत ते त्या प्रेमीस प्रियच वाटतात.''

तुम्ही शर्मदच्या अंतसमयाचा प्रसंग वाचून पहा! शर्मदची हत्या करण्यासाठी जल्लाद तेथे आला. फाशी देतेवेळी काळ्या वस्त्राने डोके झाकले जाते, त्यावेळी शर्मद त्या जल्लादास म्हणाला, ''या काळ्या वस्त्राची गरज काय? मी तुला ओळखतो, तुझे स्वागत असो.''

प्रियजनहो! आपण तेज आणि प्रकाश सारख्या उच्च पातळीवरील गोष्टींची चर्चा करीत आहोत, परंतु मी नेहमी सांगतो की, आपण जेव्हा आपल्या आत्म्यावरील तीन्ही पडदे दूर सारून परब्रह्मामध्ये पोहोचतो, तेथे लिंग-भेद, आपला-परका असा भेदभाव नाहीसा होतो. तेथे पोहोचल्यावर आपल्या लक्षात येते की आपण सर्व आत्मेच आहोत. तेथे पोहोचल्यावरच हा भिन्नतेचा भेदभाव नाहीसा होतो की हा अमेरिकन वा आफ्रीकन वा युरोपियन वा हिंदुस्थानी आहे, स्त्री वा पुरुष आहे. सच्चखंडात पोहोचलेल्या महात्म्यांचा दृष्टिकोनच बदलून जातो, ज्याचे वर्णनही केले जाऊ शकत नाही.

गुरू अर्जुनदेवजींकडे बऱ्याच सेवकांनी येऊन विनंती केली, ''हिंदुस्थानात अडुसष्ठ तीर्थांचे बरेच महात्म्य वर्णिले जाते. माघ महिन्यामध्ये या तीर्थांवर लोकं स्नान करतात. तेव्हा आपणदेखील असे स्नान करून यावे.'' गुरूसाहेब त्या प्रेमी सेवकांना अतिशय प्रेमाने संबोधित करतात :

माघ मजन संग साधूआं धूड़ी कर स्नान।
जन्म कर्म मल उतरे मन ते जाए गुमान।।

माघ महिन्यातील असली स्नान म्हणजे पूर्ण महात्म्यांसोबत परब्रह्मात जाणे होय! तेथे जाऊन पवित्र तेज प्रगट होईल. त्या तेजरूपी नदीमध्ये, तलावामध्ये जाऊन तुम्ही स्नान करा. तेथे स्नान केल्याने तुमच्यावरील

जन्मो-जन्मांतरीचा जमलेला पापरूपी मळ दूर होईल. तुमच्या अंतरातून तुमची सुटका न करणारा अहंकारही तेथून निघून जाईल, तुमची त्यापासून सुटका होईल. प्रियजनहो! तुम्हांस कल्पना आहे की वृद्धापकाळामध्ये मनुष्याची सर्व इंद्रिये त्याची साथ सोडून देतात. परंतु अहंकार मात्र मनुष्याचा अंतिम श्वास निघेपर्यंत त्याची पाठ सोडत नाही.

आपणांस किती प्रकारच्या अहंकाराने वेढलेले आहे? थोडी जरी धन-संपत्ती असेल, तरीही आपणांस अहंकार वाटतो. खरेतर आपणांस कल्पना असते की ही धन-संपत्ती मरणानंतर आपल्यासोबत येणार नाही. परमात्म्याने जर थोडे-फार सुंदर रूप दिले असेल, तर आपण अहंकार करू लागतो की आपल्या समान रूपवान कोणी नाही, केवळ आपणांसच परमात्म्याने हे सुंदर स्वरूप दिले आहे. परंतु आपणांस थोडा जरी ताप आला, तर आपला चेहरा पिवळ्या बेडकासारखा बनतो.

प्रियजनहो! जी वस्तू आपल्या सोबत जाणार नाही, त्या वस्तुचा कसला अहंकार आपण करावा? गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात की, तुम्ही जर त्या परब्रह्माच्या तलावामध्ये जाऊन स्नान केले तर तुमची अशा प्रकारच्या अहंकारापासून सुटका होईल आणि तुमच्यावरील जन्मोजन्मांतरीच्या पापांचा मळ नाहीसा होईल.

हर का नाम ध्याए सुण सबना नूं करदा।

तुम्ही शब्द-नामाची कमाई करा व इतरांनाही प्रेरणा द्या की नामातच शांती आहे. नामाशी जोडल्याने जन्म-मरणाचा फेरा सुटतो. नाम अशी शक्ती आहे जी चोर चोरी करू शकत नाही, अग्नी जिला जाळू शकत नाही, हवा त्यास उडवून नेऊ शकत नाही. नामच आपल्या जीवनाचे अन्न-पाणी आहे. आपल्यासोबत मृत्युनंतर या जगातून काही जाणार असेल तर ते नामच आहे.

***

अनमोल वचन

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे सत्संगाच्या कार्यक्रमा प्रारंभी संगतसाठी एक महत्वपूर्ण संदेश, मुंबई, महाराष्ट्र - १७ जानेवारी, १९८०



जे प्रेमी याठिकाणी ध्यान-अभ्यासाच्या कार्यक्रमात सहभागी झाले आहेत, त्यांचे मी स्वागत करतो. जे प्रेमी माझ्याबरोबर राजस्थान मधून आले आहेत, त्यांना या कार्यक्रमाबद्दल माहिती आहे. अशा प्रकारचे कार्यक्रम परमात्म्याच्या कृपेनेच होतात. आपण जाणतो की, येथे सर्वजण ध्यान-अभ्यास करण्यासाठी एकत्र झालेलो आहोत. व्यवस्थापकांनी आपणांस जी काही शिस्त समजावली आहे, त्यानुसार आपण ध्यान-अभ्यासासाठी उपस्थित राहून अधिकाधिक ध्यान-अभ्यास करावयाचा आहे. चांगले आरोग्य लाभणे, विद्या प्राप्त करणे किंवा धन-संपत्ती प्राप्त करणे काही विशेष अवघड नाही. मेहनतीने या गोष्टी प्राप्त होतात. आपण मेहनत करतो, म्हणूनच या गोष्टी आपणांस प्राप्त होतात. परंतु आपण परमात्म्याची भक्ती करणे, परमात्म्याकडे आकर्षित होणे, हे सर्व मात्र परमात्म्याने स्वत:च्या हातात ठेवले आहे. ज्यांची परमात्मा भेटीची वेळ झालेली आहे, त्यांना परमात्मा अंतरातून चावी फिरवून एखाद्या महात्म्याकडे पाठवितो. आपली सांसारिक कामं सोडून, ज्याठिकाणी महात्मा बसलेले आहेत त्याठिकाणी ते लोक पोहोचतात. त्या प्रेमींच्या आत्म्यांसाठी शब्द-नामरुपी अन्नपाणी परमात्म्याने त्या महात्म्यांजवळ ठेवलेले आहे.

आपला आत्मा जन्मो-जन्मांतरापासून शब्द-नामाचा भुकेलेला असून, तो विलाप करीत आहे. परंतु आत्म्याचा आवाज कोणीही ऐकत नाही. केवळ संत-महात्मेच आपणांस येऊन सांगतात की या भुकेलेल्या आत्म्याचा आवाज देखील ऐका. परमात्म्याची आपल्यावर विशेष कृपा आहे की, त्याने आपणांस शब्द-नामाशी जोडण्याची संधी दिली आहे. आपलेदेखील कर्तव्य आहे की आपण त्या शब्दरुपी प्रभुचे आभार प्रगट करावे, जो देह धारण करून या जगामध्ये येतो. आजपर्यंत कोणीही शब्दरूपी सतगुरू शक्तीचे आभार मानलेले नाही; त्यांच्याशी एकरूप होणारी माणसेच केवळ त्यांचे आभार मानतात. जोपर्यंत आपले आंतरीक पडदे दूर सरत नाहीत, तोपर्यंतच आपण सतगुरूंना मनुष्य मानतो. ज्या मनुष्याचा पडदा दूर होतो तो सतगुरूंना विश्वाचा कर्ता-करविता म्हणू लागतो. गुरू अर्जुनदेवजी सांगतात :

आपन लिए जे मिले बिछड़ को रोवन।

तुला भेटणे तर आमच्या हातामध्ये असते, तर तुझ्यापासून दुरावून आम्ही रडत-विलाप करीत का बरे फिरत राहिलो असतो. आपण किती युगांपासून या दु:खी जगामध्ये फेऱ्या मारीत आहोत, याची आपणांस कल्पनाही नाही. येथे तुम्ही सर्वजण भक्ती करण्यासाठी आला आहात; तुम्हा सर्वांचे मी स्वागत करतो. जे ध्येय समोर ठेवून तुम्ही आपले घर-दार सोडून येथे आला आहात, ते ध्यान-अभ्यास करण्यामध्ये आपला मौल्यवान वेळ व्यतीत करावयाचा आहे; मनाचे सांगणे तुम्ही ऐकू नका.

मी बाबा सोमनाथजींच्या प्रेमींचे आभार मानतो, ज्यांच्या अंतरामध्ये बसून बाबांजींनी प्रेम जागृत केले. हे प्रेमी दरवर्षी मेहनत घेऊन बाबाजींच्या आठवणीमध्ये रममाण होतात. आपणांस माहिती असणे गरजेचे आहे की संत जन्म-मरणाच्या फेऱ्यामध्ये अडकलेले नसतात. ते परोपकारासाठीच या जगामध्ये येत असतात. संत ज्या आत्म्यांना शब्द-नामाशी जोडतात, त्या आत्म्यांची ते सच्चखंडात बसून काळजी घेत असतात.

ज्यावेळी माझी बाबा सोमनाथजींशी भेट झाली तेव्हा बाबा बिशनदाजींनी महाराज सावन सिंहजींना सांगितले की, माझ्या या शिष्याने अनेकदा धूनीतप (सर्वबाजूंनी अग्नी प्रज्वलीत करून केलेला तप) केला असून हिंदुस्थानामध्ये जे काही हठयोग केले जातात, ते याने केलेले आहेत. त्यावेळी महाराज सावन सिंहजींनी बाबा सोमनाथजींना बोलावले आणि त्यांची प्रशंसा करीत म्हणाले की, माझ्या या सेवकाने देखील परमात्मा प्राप्तीसाठी खूप काही केले आहे. अनेक प्रकारचे हठयोग केले आहेत.

मी नेहमी ठासून सांगत असतो की, साधुच्या कपाळावर एखादी पाटी लिहिलेली नसते की, हा साधु परिपूर्ण आहे किंवा हा पाखंडी आहे. आपणच साधुचे पूर्व जीवन पाहावयास हवे, त्याचा अभ्यास करावयासच हवा की, या साधुने त्याच्या जीवनामध्ये दहा-वीस वर्षे किंवा त्याहूनही अधिक काळ परमात्म्याच्या आठवणीमध्ये व्यतीत केला आहे? परमात्माप्राप्तीसाठी अनेक रात्री जागरण केले आहे, मेहनत केली आहे काय?

आपणदेखील मेहनत करावयास हवी. मेहनतीशिवाय जगातील कोणतीही वस्तू प्राप्त होत नाही. खरेतर संत-महात्मे सचखंडामधूनच परिपूर्ण बनून आलेले असतात, परंतु तरीही ते येथे येऊन मेहनत करतात. त्यांचा मेहनत करण्याचा हाच हेतु असतो की जगाला एक उदाहरण द्यावे जेणेकरून जगातील लोकांना कल्पना यावी की, यांनी इतकी मेहनत केली आहे, आपणदेखील मेहनत करावी.

सज्जनहो! आपण मेहनत करण्यामध्ये कुचराई करता कामा नये, मनाशी संघर्ष करीत राहवयास हवा; संघर्ष करणे म्हणजेच ध्यान-अभ्यास करणे होय! तुमचे मन तुम्हांस आज सल्ला देते की, रात्र मोठी आहे, आपण उद्या ध्यान-अभ्यास करू. परंतु तेच मन उद्याही आपल्या सोबत असणार आहे. आज जो सल्ला मन देत आहे, तोच सल्ला उद्या ते तुम्हांस देईल.

***